## १. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-

१.१ राज्य शासनाच्या सेवेतील अतांत्रिक राजपत्रित गट-अ व गट-ब संवर्गातील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात:-

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनबँड व ग्रेड वेतन रुपये | उच्च पदावर बढतीची संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | उप जिल्हाधिकारी, गट - अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उप जिल्हाधिका-याच्या निवडश्रेणीत व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २ | पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट - अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपायुक्त व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ३ | सहायक विक्रीकर आयुक्त,गट-अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | विक्रीकर उपायुक्त व त्यापुढील पदे. | महाराष्ट्रात कोठेही |
| ४ | उपनिबंधक, सहकारी संस्था,गट-अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | सहनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी(उच्च श्रेणी),गट-अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र विकास सेवेतील वरिष्ठ पदावर. | महाराष्ट्रात कोठेही |
| ६ | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ (वरिष्ठ)व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ७ | मुख्याधिकारी,नगरपालिका/परिषद, गट- अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | निवड श्रेणीतील पदावर | नगरपालिका /परिषद क्षेत्रात |
| ८ | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट -अ | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपायुक्त (वरिष्ठ) व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ९ | शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा,गट-अ (प्रशासन शाखा) | १५,६००-३९,१००,५४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | शिक्षण उपसंचालक व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १० | तहसिलदार, गट - अ | १५,६००-३९,१००,५०००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपजिल्हाधिकारी व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ११ | उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा,गट-ब (प्रशासन शाखा) | ९,३००-३४,८००, ४८००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | शिक्षणाधिकारी व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १२ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट -ब | ९,३००-३४,८००,४,६००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट –अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १३ | लेखा अधिकारी,महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ)व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १४ | कक्ष अधिकारी, गट-ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते | अवर सचिव व त्यापुढील पदे | फक्त मुंबई |
| १५ | गट विकास अधिकारी, गट -ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र विकास सेवा, गट -अ व निवडश्रेणीत | महाराष्ट्रात कोठेही |
| १६ | मुख्याधिकारी ,नगरपालिका / नगर परिषद, गट- ब | ९,३००-३४,८००,४,४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | मुख्याधिकारी नगरपालिका / नगर परिषद,गट -अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही नगरपालिका/नगर परिषद क्षेत्रात |
| १७ | सहायक निबंधक सहकारी संस्था, गट - ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १८ | उप अधीक्षक , भूमि अभिलेख, गट -ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,गट -अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १९ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट -ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २० | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट -ब | ९,३००-३४,८००,४,४००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपायुक्त (कनिष्ठ) राज्य उत्पादन शुल्क, गट –अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २१ | नायब तहसिलदार, गट-ब | ९,३००-३४,८००,४,३००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | तहसिलदार,गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |

१.२ शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे** :-

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण तीन टप्प्यात घेण्यात येते :-

(**एक**) पूर्व परीक्षा - ४०० गुण. (**दोन**) मुख्य परीक्षा - ८०० गुण. (**तीन**) मुलाखत- १०० गुण

२.२ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. याकरिता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येते.

२.३ पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जात नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.

२.४ मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

२.५ जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३.अर्हता**:-

३.१ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ; सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब तसेच लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -ब ही पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता.

३.२ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ तसेच लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट –ब या पदांकरिता खालीलप्रमाणे अर्हता आवश्यकः-

(१) सांविधिक विदयापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस आफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा

(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा

(४) सांविधिक विदयापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा

(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त् व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदवी (एम.बी.ए)

३.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता भौतिकशास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान अथवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी.

३.४ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

३.५ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

३.६ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

३.७ पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ, अधीक्षक राज्य उत्पादनशुल्क, गट-अ, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहेः-

(**एक**) **पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ**:-

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |

(**दोन**) **अधीक्षक, राज्य उत्पादनशुल्क, गट-अ व उपअधीक्षक राज्य उत्पादनशुल्क, गट-ब**:-

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता- किमान ५ से.मी. आवश्यक | उंची-१५५ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |

(**तीन**) **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब**:-

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| उंची - १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी.आवश्यक<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. | उंची-१६३ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) चष्म्यासह<br>अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि<br>रंगांधळेपणा नसावा. |

३.८ वर नमूद केलेल्या पोलीस उप अधिक्षक / सहायक पोलीस आयुक्त गट अ, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट अ, उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब या पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

३.९ प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल व त्याची अन्य पदासाठी शिफारस केली जाणार नाही.

**४. शुल्क (फी):-**

४.१ प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहेः-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | राज्यसेवा पूर्व परीक्षा | ५२३/- | ३२३/- |
| (२) | राज्यसेवा मुख्य परीक्षा | ५२३/- | ३२३/- |

४.२ वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

४.४ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. पूर्व परीक्षाः -**

**५.१ परीक्षा योजनाः-**

**५.१.१ परीक्षेचे टप्पेः- एक लेखी परीक्षा एकूण ४०० गुण**

**५.१.२ प्रश्नपत्रिका- दोन अनिवार्य**

**५.१.३ प्रश्नपत्रिकेचे स्वरुपः- खाली नमूद केल्याप्रमाणे दोन अनिवार्य प्रश्नपत्रिका असतील:-**

| Paper No. | Code | No. of Questions | Marks | Standard | Medium | Duration | Nature of Paper |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Paper I (compulsory) | 035 | 100 | 200 | Degree | Marathi & English | Two hours | Objective Type Multichoice |
| Paper II (compulsory) | 036 | 80 | 200 | Topic No.(1) to (5) Degree level<br>Topic No.(6) class X level<br>Topic No.(7) X / XII level | | Two hours | |

**५.१.४ अभ्यासक्रमः- पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमाप्रमाणे आहे:-**

(एक) **Paper I - (200 marks)**

(1) Current events of state, national and international importance.
(2) History of India (with special reference to Maharashtra) and Indian National Movement.
(3) Maharashtra, India and World Geography - Physical, Social, Economic Geography of Maharashtra, India and the World.
(4) Maharashtra and India - Polity and Governance - Constitution, Political System, Panchayati Raj,Urban Governance, Public Policy, Rights issues, etc.
(5) Economic and Social Development - Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector initiatives, etc.
(6) General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change-that do not require subject specialisation.
(7) General Science.

**(दोन) Paper II - (200 marks)**

(1) Comprehension
(2) Interpersonal skills including communication skills.
(3) Logical reasoning and analytical ability.
(4) Decision - making and problem - solving.
(5) General mental ability.
(6) Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) **(Class X level)**, Data interpretation (Charts, graphs, tables, data sufficiency etc**.- Class X level**)
(7) Marathi and English Language Comprehension skills **(Class X/XII level).**

५.१.५ Questions relating to Marathi and English Language Comprehension skill of Class X/XII level (last item in the Syllabus of Paper II) will be tested through passages from Marathi and English language without providing cross translation thereof in the question paper.

५.१.६ राज्य सेवा पूर्व परीक्षांच्या मुल्यांकनाकरिता उमेदवारांनी दोन्ही पेपर्सकरिता उपस्थित राहणे अनिवार्य आहे. प्रस्तुत राज्यसेवा पूर्व परीक्षेकरिता दोन्ही पेपर्सकरिता उपस्थित न राहणा-या उमेदवारांना अनर्ह ठरविण्यात येईल.

**५.२ परीक्षा केंद्र** : -

५.२.१ खालील ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |
| हिंगोली | २३ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशिम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |
| नवी मुंबई | ४८ |

५.२.२ उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

५.२.३ उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

५.२.४ विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले परीक्षाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

५.२.५ एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

५.२.६ एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.३ पूर्व परीक्षेचा निकाल**: -

५.३.१ वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रस्तुत परीक्षेच्या प्रश्नपत्रिका क्रमांक २ मधील अभ्यासक्रमातील “Decision Making & Problem Solving” हा घटक वगळून दोन्ही प्रश्नपत्रिकेमधील उर्वरित प्रश्नाच्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

५.३.२ प्रश्नपत्रिका क्रमांक २ मधील अभ्यासक्रमातील “ Decision Making & Problem Solving ” या घटकाच्या चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा करण्यात येणार नाहीत.

५.३.३ भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

५.३.४ केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

५.३.५ प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

५.३.६ अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

५.३.७ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

५.३.८ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा**

**६.१ परीक्षेस प्रवेशः-**

६.१.१ पूर्व परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या मर्यादेनुसार अर्हताप्राप्त होणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.१.२ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे अथवा /व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून चलनाद्वारे परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

६.१.३ प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल.इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.२. परीक्षा योजनाः-**

६.२.१ **परीक्षेचे टप्पेः**- दोन - लेखी परीक्षा ८०० गुण व मुलाखत १०० गुण.

६.२.२ **एकूण प्रश्नपत्रिकाः**-६.

६.२.३ **प्रश्नपत्रिकेचे स्वरुप**:-प्रस्तुत लेखी परीक्षेमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे सहा अनिवार्य प्रश्नपत्रिका असतीलः-

| पेपर क्रमांक | संकेताक | विषय | | प्रश्न संख्या | गुण | दर्जा | माध्यम | एकूण कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०४२ | भाषा पेपर-१ | मराठी | -- | ५० | उच्च माध्यमिक शालान्त | मराठी | ३ तास | पारंपरिक/वर्णनात्मक |
| | | | इंग्रजी | -- | ५० | | इंग्रजी | | |
| २ | ०४३ | भाषा पेपर-२ | मराठी | ५० | ५० | पदवी | मराठी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | | इंग्रजी | ५० | ५० | | इंग्रजी | | |
| ३ | ०३१ | सामान्य अध्ययन-१ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ४ | ०३२ | सामान्य अध्ययन-२ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ५ | ०३३ | सामान्य अध्ययन-३ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ६ | ०३४ | सामान्य अध्ययन-४ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

६.२.४ **अभ्यासक्रम**:- सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६.२.५ पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेच्या वेळी आयोगाकडून उमेदवारांना पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

६.२.६ मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

६.२.७ भाषा पेपर क्रमांक १ मधील दोन्ही भागांकरिता (मराठी व इंग्रजी) एकच संयुक्त प्रश्नपत्रिका राहील.

६.२.८ भाषा पेपर क्रमांक २ मधील दोन्हीं भागांकरिता (मराठी व इंग्रजी) एकच संयुक्त प्रश्नपुस्तिका राहील. त्यामध्ये खालीलप्रमाणे दोन विभाग राहतीलः-

(१) मराठी भाषेचे प्रश्न क्रमांक १ ते ५० आणि

(२) इंग्रजी भाषेचे प्रश्न क्रमांक ५१ ते १००.

६.२.९ पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या पेपर क्रमांक १ (मराठी व इंग्रजी) करिता भाग-१ (मराठी) व भाग-२ (इंग्रजी) साठी दोन स्वतंत्र उत्तरपुस्तिका एकाच वेळी पुरविण्यात येतील. मराठी भाषेसाठी तसेच इंग्रजी भाषेसाठी स्वतंत्र उत्तरपुस्तिकांचा वापर करणे अनिवार्य आहे.

६.२.१० भाषा पेपर क्रमांक १ भाग-१ (मराठी) च्या उत्तरपुस्तिकेमध्ये भाग-२ (इंग्रजी) चे प्रश्न सोडविल्यास किंवा भाग – २ (इंग्रजी) च्या उत्तरपुस्तिकेमध्ये भाग-१ (मराठी) चे प्रश्न सोडविल्यास अशी उत्तरे तपासली जाणार नाहीत व ती दुर्लक्षित केली जातील.

६.२.११ पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड किंवा १, २, ३, ४ ) सलगरित्या सोडवावे. प्रश्नाचा एक भाग एका पानावर, तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल.

६.२.१२ भाषा पेपर क्रमांक २ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी) मधील दोन्ही भागांकरिता एकच सामाईक उत्तरपत्रिका राहील.

**६.३ परीक्षा केंद्र :-**

६.३.१ खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १५ | नागपूर | ३२ |
| मुंबई | ३० | पुणे | ३८ |

६.३.२ उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

६.३.३ परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतो.

६.३.४ विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

६.३.५ एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

६.३.६ एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेद्रांमध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.४ लेखी परीक्षेचा निकाल:-**

६.४.१ वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

६.४.२ भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीकरिता उपलब्ध होतील अशा रितीने सर्व पेपरच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी तसेच महिला,विकलांग, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

६.४.३ प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

६.४.४ प्रस्तुत लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय- किमान ३० शतमत

(३) विकलांग- किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू- किमान २० शतमत

६.४.५ विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास दोन्हीपैकी एकच सवलत घेता येईल.

६.४.६ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ई-मेलद्वारे अथवा / व मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

६.४.७ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच विकलांग व महिला उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही व केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल.

**६.५ पदांचा पसंतीक्रम:** -

मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील. अशा प्रकारे पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(३) आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

(४) वरील परिच्छेद क्रमांक ३.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शारीरिक पात्रतेच्या व शैक्षणिक अर्हतेच्या अटी पूर्ण न करणा-या उमेदवारांनी संबंधित पदासाठी पसंतीक्रम नमूद करू नये.

(५) अपंग उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णयान्वये अपंग उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही. याबाबतचा तपशील जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिला जाईल.

**६.६ मुलाखतः-**

**६.६.१** वरील परिच्छेद क्रमांक ६.४ नुसार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत **१०० गुणांची** असेल.

**६.६.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**६.६.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**६.६.४** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**६.७ अंतिम निकालः—**

लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**६.८ शिफारस :-**

६.८.१ "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

६.८.२ मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

************